# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.03.2025** **वारःशनिवार**

---

1. राज्य सरकारच्या पाचशे सेवा आता नागरिकांना व्हॉट्सॲपवर उपलब्ध होणार-मुख्यमंत्र्यांची माहिती
2. स्वारगेट बसस्थानक महिला अत्याचार प्रकरणातील आरोपीला 12 मार्चपर्यंत पोलिस कोठडी
3. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्यातील महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीतर्फे विशेष सवलत योजना आणि
4. येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील इयत्ता 11वीचे प्रवेश ऑनलाइन करण्याचा राज्य शासनाचा निर्णय

**<u>फडणवीस</u>**

राज्य सरकारनं फेसबुक आणि व्हॉट्सअपची प्रवर्तक असलेल्या 'मेटा' या कंपनीबरोबर सामंजस्य करार केला आहे. याद्वारे व्हॉट्सॲप गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या पाचशे सेवा सामान्य नागरिकांना व्हॉट्सॲपवर उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. मुंबई टेक वीक-2025 या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सार्वजनिक धोरणांच्या माध्यमातून भवितव्याची आखणी' या विषयावर ते बोलत होते.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात एनपीसीआय या जगातल्या सर्वात मोठ्या यूपीआय पेमेंट गेटवे कंपनीचं जागतिक मुख्यालय मुंबईत सुरु केलं जाणार आहे. त्यासाठी आवश्यक जमीन कंपनीला हस्तांतरित केली जाणार असून त्याची कागदपत्रं काल कंपनीला सोपवण्यात आल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले.....

**<u>स्वारगेट अत्याचार</u>**

पुण्यातील स्वारगेट बस स्थानक महिला अत्याचार प्रकरणाणातील आरोपी दत्तात्रय गाडे 12 मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयानं काल दिले. गाडे याला गुरुवारी रात्री उशिरा शिरूर तालुक्यातील गुनाट गावातून अटक करण्यात आली; त्यानंतर काल संध्याकाळी त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. आरोपी दत्तात्रय गाडेला अटक करण्यासाठी पोलिसांनी ड्रोनचाही वापर केला. पाचशे पोलिस कर्मचारी या तपासासाठी तैनात करण्यात आले होते, असं पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल सांगितलं. हे प्रकरण द्रुतगती न्यायालयात चालवण्यात येईल, असंही ते म्हणाले. पुणे शहरातील संवेदनशील ठिकाणी दिव्यांची सुविधा वाढवणार असल्याचं तसंच महिला सुरक्षेसाठी अधिक सतर्क राहणार असल्याचं आयुक्तांनी सांगितलं. या प्रकरणाविषयी मुंबईत बातमीदारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले....

**<u>एसटी</u>**

दरम्यान, एसटी स्थानकं आणि आगारांमधील सर्व बसगाड्या प्रवासी उतरल्यावर कुलुपबंद करण्याचे आदेश विभागातील 14 आगारांना पुणे विभाग नियंत्रकांनी दिले आहेत. स्वारगेट आगारात घडलेल्या अत्याचाराच्या घटनेच्या

पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेबाबत प्रशासनाकडून घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा काल घेण्यात आला. बेफिकीर चालक -वाहकांबाबत माहिती मिळाल्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचं पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांनी सांगितलं.

**<u>महिला पर्यटक</u>**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अर्थात MTDCतर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचं औचित्य साधून राज्यातील महिला पर्यटकांसाठी आजपासून 8 मार्चपर्यंत एमटीडीसीच्या पर्यटक निवासांमध्ये 50 टक्के सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीसह विविध पर्यटन उपक्रम देखील राबविण्यात येणार आहेत. 'आई' या महिला केंद्रित आणि लिंगसमावेशक पर्यटन धोरणांतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी काल दिली.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज एक दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. या भेटीदरम्यान ते के. पी. बी. हिंदुजा महाविद्यालयाच्या वार्षिक दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<u>प्रवेश-मुंबई</u>**

येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यभरातले इयत्ता 11 वीचे प्रवेश ऑनलाइन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासंदर्भातला शासन आदेश काल प्रसिद्ध झाला. आतापर्यंत केवळ मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक महापालिका क्षेत्रातले 11 वी चे प्रवेश ऑनलाइन होत होते. इयत्ता 11 वी चे सर्व प्रवेश ऑनलाइन होणार असले तरी पहिल्या 4 फेऱ्या झाल्यानंतर वर्ग सुरू होतील, असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<u>विज्ञानदिन-रत्नागिरी</u>**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त काल पुण्यासह राज्यात अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालयं आणि विविध संस्थांनी अनेक उपक्रमांचं आयोजन केलं होतं. रत्नागिरी जिल्ह्यातील खेडशी इथल्या श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात विविध स्पर्धा तसंच विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रयोगांच्या प्रारूपांचं प्रदर्शनही भरवण्यात आलं होतं. जिल्हा परिषदेने घेतलेल्या परीक्षेद्वारे 'नासा'च्या सहलीसाठी निवड झालेल्या सना होरंबे आणि लावण्या पवार या पानवल गावातल्या दोन विद्यार्थिनींचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

पुण्यातील आयुका आणि पुण्याजवळच्या खोडद इथल्या जीएमआरटी या संस्थांना अनेक विद्यार्थी आणि विज्ञानप्रेमी नागरिकांनी भेट दिली. जीएमआरटी संस्थेमध्ये विज्ञान दिनानिमित्त कालपासून दोन दिवसांच्या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. जीएमआरटीचे विज्ञान प्रसार अधिकारी डॉक्टर जे. के. सोळंकी खोदड इथं भरलेल्या प्रदर्शनाविषयी आकाशवाणीला माहिती देताना म्हणाले....

**<u>भोसले-लातूर</u>**

महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्यांविरोधात करवाई करण्यासाठी राज्य सरकार लवकरच कायद्यात बदल करणार आहे, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली. ते काल लातूर जिल्ह्यातील अहमदपूर इथं पत्रकारांशी बोलत होते.

**अन्नपदार्थातील भेसळ- नागपूर**

अन्नपदार्थातील भेसळ ओळखण्यासाठी राज्यात 28 फिरत्या प्रयोगशाळा देण्यात येणार आहेत. यामुळे अन्नाचे नमुने, विश्लेषण अहवाल तातडीने मिळण्यास मदत होणार आहे. तसंच प्रयोगशाळेत प्रलंबित असलेल्या अन्नचाचण्या विहित मर्यादेत कराव्यात, असे निर्देश अन्न, औषध प्रशासन आणि विशेष सहाय्यमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले. झिरवाळ यांनी काल नागपूरमध्ये या विभागांच्या कामाचा आढावा घेतला. दुग्धजन्य पदार्थ, मिठाईची निर्मिती आणि विक्रीची कसून तपासणी करावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

**PCMC**

राज्य शासनाच्या शंभर दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही सर्वोत्तम कामगिरी करणारी महापालिका ठरली आहे. राज्यभरातील महापालिकांचे आणि अन्य क्षेत्रीय कार्यालयांचं मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 100 दिवसांचा कृती आराखडा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मध्यावधी आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**आयसीसी करंडक**

आयसीसी करंडक अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धेत काल लाहोर इथं झालेल्या ब गटाच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं उपांत्यफेरीत प्रवेश केला आहे. पावसाच्या व्यत्ययामुळं दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला. ऑस्ट्रेलिया, भारत आणि न्यूझीलंड संघानं गट अ मध्ये विजय मिळवत उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.